# WOMEN EMPOWERMENT:

## Role in Social Science

**Chief Editor**

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. C.B. Satpute

Dr. S.U. Kalme

Mr. K.B. Giri

ISBN No. 978-93-83995-66-1

Anuradha Publications, Nanded

# Women Empowerment: Role in Social Science

**Chief Editor**

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. S.U. Kalme

Mr. K.B. Giri

**ISBN No.** 978-93-83995-66-1

**Published by:**

Anuradha Publications

Cidco-Nanded

**Publication Year:** 2019-20

**Price-** Rs. 100/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**

Gurukrupa Offset,

Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**

Simran Computers

Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**

Mr. Imran K. Mohammad

# CONTENTS

| Sr. No. | Content |
|---|---|
| 01 | स्त्री तत्त्वज्ञ : संत जनाबाई<br>प्रा.डॉ.सचिन खोकले |
| 02 | परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास<br>डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे |
| 03 | भारतातील महिला सक्षमीकरणाची वास्तव व गरज एक अभ्यास<br>डॉ. दर्शना साहेबराव कानवटे, प्रा.डॉ.दयानंद उजळंबे |
| 04 | आदिम धर्म अस्तित्व आणि आव्हाने<br>प्रा. राजेश धनचकर |
| 05 | Representation of Social Reality in the Play 'Silence! The Court Is In Session` of Vijay Tendulkar<br>Mr. Kailas B. Giri |
| 06 | महात्मा फुले यांचे सामाजिक योगदान.<br>प्रा.डा. दिपमाला विशनाथ रायठक |
| 07 | घुमंतू बंजारा समाज की संस्कृति<br>प्रा.डॉ. महावीर रामजी हाके |
| 08 | Portrayal of Caste Discrimination in the Works of Mahatma Phule<br>Mr .Kailas B Giri |
| 09 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील समाजजीवन<br>डॉ. राजेश धनजकर |
| 10 | स्त्री-सक्षमीकरणाच्या विविध योजना<br>प्रा.डॉ.सचिन खोकले |
| 11 | गोदाकाठची भक्तिगंगा संत जनाबाई<br>प्रा.राजेश भालेराव |

# आदिम धर्म अस्तित्व आणि आव्हाने

प्रा. राजेश धनचकर
श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गंगाखेड जि. परभणी

स्वातंत्र्याच्या 63 वर्षानंतरही आदिवासी समाजाचा सामाजिक,आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक विकास झालेला नाही. ही खेदाची बाब आहे. प्राचीन काळापासून आदिवासी समाजाचे अस्तित्व आजही मानलें जात आहे. हे सगळे खरे असले तरी आज मात्र आदिवासी समाजापुढे मोठी आव्हाने आहेत. आजही आमचे बहुसंख्य आदिवासी दऱ्याखोऱ्या जंगलात राहतात त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात काय चालले आहे. याची ओळख त्यांना होऊ शकली नाही अशा या आदिवासीचा मूळ धर्म हा पारंपारिक आणि निसर्गवादी आहे. या धर्मावर सर्वच धर्माचे चहुबाजूनी हल्ले सुरू झालेले आहेत. आज सर्वजण म्हणत आहेत की आदिवासींकडे फार आदर्श संस्कृती आहे पण त्यांच्याकडे धर्माचे ओळखपत्र नाही. आमची प्राचीन संस्कृती आजही आम्ही सिद्ध करू शकतो पण आज आम्हाला धर्माच्या संदर्भात काही बोलता येत नाही म्हणून आज आम्हाला आदिवासी धर्माची तत्वे जगापुढे मांडायची वेळ आलेली आहे. जोपर्यंत ही तत्वे आम्ही मांडणार नाही तोपर्यंत धर्माचे अस्तित्व तिथं होणार नाही

आदिवासी माणूस निसर्गाच्या सानिध्यात रहात असल्याने निसर्गाबद्दलची एक आदरयुक्त भीती आदिवासी समाजात आहेच. निसर्गात एक अलौकिक शक्ती आहे आणि ही शक्ती आमच्यावर अंकुश सत्ता गाजवते असे आमचे मत आहे. आदिवासींचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक नाही आम्ही निसर्गाला आमचा मित्र मानतो जेव्हा एखादा प्रलय येतो तेव्हा आम्ही निसर्गाकडे शत्रू म्हणून पाहतो ही आदीन धर्माची एक महत्त्वाची बाब आहे. एकीकडे या निसर्गाची अफाट शक्ती पाहून आमचा आदिवासी माणूस हवा होतोय निसर्गातील घडामोडींना तोंड देण्यासाठी संकटावर मात करण्यासाठी निसर्गदेवतेला संतोष करण्याची पद्धत आदिवासी समाजात आहे. या निसर्गातील प्रत्येक घटकांमध्ये आम्ही देवत्व पाहतो या सर्व घटकांची आदिवासी माणूस पूजा करतो पशुपक्षी आणि वर्गातील शक्तीला देव मानतो या शक्तीचे अस्तित्व कधीच नष्ट होत नाही निरंकूषपणे ही शक्ती आमच्यावर आधी राज्य गाजवत असते अशी आमची धारणा आहे आम्हाला प्रथम संस्कृती शोधावी लागेल आणि त्यातून आमचे धार्मिक जीवन कळेल फार वर्षांपूर्वी वाशिम मध्ये

काही आदिवासी बांधवांनी धर्म बौद्ध धर्म स्वीकारला किनवटच्या धर्म परिषदेत 1000 आदिवासी पारधी समाजाने बौद्ध धर्म स्वीकारला लक्ष्मण माने तर म्हणतात की शेकडा 60 आदिवासी बौद्ध धर्म स्वीकारतील बल्लारपूर मधील काही मडावी कुटुंबांनी बौद्ध धर्म स्वीकार केला. आदिवासी धर्म स्थापन करणाऱ्या सर्व जाणकारांनी विचारवंतांनी त्याचा विचार करायला हवा आदिवासी धर्माची स्थापना करताना कला संगीत चित्र यांचे महत्त्व स्पष्ट करावे लागेल कारण आदिवासी मधल्या या कला त्यांच्या धर्माचे तत्त्व स्पष्ट करतात जोपर्यंत आम्ही आदिवासी धर्माची स्थापना करणार नाही तोपर्यंत आदिवासींमध्ये राजकीय सामाजिक शैक्षणिक परिवर्तन घडून येणार नाही आमची अस्मिता सिद्ध करण्यासाठी धर्माची आवश्यकता आहे. आमच्याकडे ओळखपत्र आहे त्याशिवाय आम्हाला जगात कोणतीच कोणीच विचारत नाही संस्कृतीबद्दल आम्ही खूप बोलत आहोत पण धर्माचे काय कुठल्याच धर्माचे नाव सांगता येत नाही. जैन धर्मीय बौद्ध धर्मीय पूर्वी हिंदू होते परंतु या वैदिक धर्माला कंटाळून त्यांनी आपले विविध धर्म स्थापन केले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 चा सुवर्ण दिवस दलितांच्या जीवनात निर्माण केला तसा आम्हाला आदिवासी धर्म स्थापन करावा लागेल तमाम आदिवासी बांधवांनी मी विनंती करतो की, या देशाला आदिवासी माणूस आम्हाला एका झेंड्याखाली आणायचा आहे. आदिवासी धर्माची तत्वे आम्हाला प्रत्येक माणसाच्या गळी उतरायचे आहेत आदिवासी संस्कृती श्रम समूह आणि सहकार्यावर आधारित आहे. ती मानवतावादी आहे आदिवासींमध्ये श्रमप्रतिष्ठा महत्त्वाचे आहे माणसावर माणूस विश्वास ठेवणारी आणि प्रेम करणारी संस्कृती आहे आमचा आदिवासी माणूस माणुसकीवर प्रेम करणार आहे. जर आम्ही संस्कृतीच्या धर्माच्या झेंड्याखाली एकत्र आलो नाही तर हळूहळू आम्हाला संपविले जाईल आदिवासी धर्मा त जी विवाह पद्धती आहे त्यात मुलीच्या सौंदर्यपेक्षा श्रमाचा जास्त विचार केला जातो काळ्या रंगाच्या मुलीचा विचार काळा मातीशी केला जातो कारण ती जननी आहे तिचे रक्षण करणे तिची प्रतिष्ठा ठेवणे म्हणजेच या पृथ्वीतलावर मानव जात अस्तित्वात ठेवणे होय अंगावर गोंदणे ही सुद्धा सौंदर्यावर आधारलेली संस्कृती आहे. आमच्या संस्कृतीचे संक्रमण परंपरेने आलेल्या आहे.

महात्मा गांधींनी दलित आणि आदिवासीसाठी हरिजन आणि गिरीजन असा शब्द वापरला होता. भारतीय संविधानात मात्र जाती आणि जमाती याचा उल्लेख आहे. आज या देशांमध्ये आदिवासींना आदिवासी म्हणणार रा कोणीच नाही विश्व हिंदू परिषद वाले आदिवासींचे अस्तित्व नष्ट करून त्यांचे वनवासीकरण करीत आहेत प्रथमता मी त्यांना आवाहन करतो की आदिवासी कल्याण आश्रम मधील वनवासी हा शब्द काढून आदिवासी शब्द लिहा वैदिक साहित्यिकांनी

आदिवासींच्या लोकसाहित्यावर लिखाण करून आदिवासी हे हिंदू धर्मीय आहेत असे नमूद केले आहे.डॉक्टर प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्यावर जेवढे लिखाण केले आहेत. त्यात आदिवासी वनवासी आहेत असे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ.माहेश्वरी गावित यांच्या प्रबंधात असा उल्लेख आहे की वैदिक संस्कृतीचे काही घटक आदिवासी संस्कृतीमध्ये दिसून येतात खरे तर त्यांनी यावर विचार करायला हवा होता की, वैदिक संस्कृती कधीही कधीची आहे आणि आदिवासी संस्कृती कधीची आहे वास्तविक पाहता वैदिक संस्कृतीच्या हजारो वर्ष अगोदर आदिवासी संस्कृती आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने जगात नऊ ऑगस्ट हा दिवस आदिवासी दिवस व 12 डिसेंबर 1992 ते 11 डिसेंबर 1993 ही आदिवासी जाहीर करावे अशी घोषणा दिली होती परंतु या देशाची सत्ता नेहमी ब्राह्मणांच्या हातात राहिली आणि त्यामुळे हे आदिवासी वर्ष आपल्याला कसरे साजरे करू देतील 11 डिसेंबरच्या अगोदर या मनुवादी लोकांनी सहा डिसेंबरला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन या दिवशी देशातील बौद्ध आणि दलित यांच्या मस्त झोपून दिली या देशात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे आणि या सर्व आमच्या आदिवासी वर्ष विसरून गेले या देशात संस्कृत भाषा बोलणाऱ्यांची संख्या किती आणि या देशात आदिवासी भाषा बोलणाऱ्यांची संख्या किती संस्कृतच्या अभ्यासासाठी विद्यापीठाची स्थापना केली जाते परंतु आदिवासीच्या या विविध बोरींच्या अभ्यासासाठी कुठे विद्यापीठ आहे का आदिवासींच्या या बोली बरोबर आदिवासींनाच नष्ट करण्याचे षडयंत्र या देशात चालविले आहे आदिवासी संशोधक सांगत आहे की भारतातील 114 आदिवासी भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत याचा अर्थ शेकडो पन्नास आदिवासीच आदिवासी धर्मापासून दूर होईल असे म्हणायला हरकत नाही या देशातल्या प्रत्येक आदिवासी भाषेत साहित्य निर्मिती झाली तर किती समृद्ध साहित्याची निर्मिती होईल जेव्हा विश्व मराठी साहित्य संमेलन घेतले जाते तेव्हा विचार करा की मराठी बोलणाऱ्यांची संख्या किती आहे आणि आदिवासींच्या बोल बोलीभाषा बोलणाऱ्यांची संख्या किती आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात आदिवासी बोली बोलणाऱ्यांची संख्या मराठी बोलणाऱ्या पेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे म्हणून विश्व आदिवासी साहित्य संमेलन होणे गरजेचे आहे म्हणून आदिवासी धर्माची स्थापना करताना या प्रश्नाची उकल करावयाची आहे.

******